

# मे महिन्याच्या अखेरीस ५० टक्के काम होणार पूर्ण

## मेट्रो ३ प्रकल्पाचे भुयारीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-बांद्रा-सीप्झ या मेट्रो-३ या संपूर्णतः भुयारी मार्गिकेच्या भुयारीकरणाच्या कामाला आता गती आली आहे. हे काम मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडकडून (एमएमआरसी) सात पॅकेजमध्ये करण्यात येत आहे. मे महिन्याच्या शेवटपर्यंत ५० टक्के काम पूर्ण करण्यात येईल, असे एमएमआरसीएलकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मेट्रो-३ मार्गिका ही ३२.५ किमी लांबीची जरी असली, तरी संपूर्ण ५२.७ किमी लांबीचे संपूर्ण भुयारीकरण करण्यात येणार आहे. सात पॅकेजनुसार प्रत्येक कंत्राटदाराकडून भुयार खणण्याचे काम सुरु करण्यात आले होते. हे काम नियोजनात्मक पद्धतीने सुरु आहे. भुयार खणण्यासाठी एकूण १७ पैकी १४ टीबीएम मशिन कार्यरत असल्याचेही एमएमआरसीकडून सांगण्यात आले आहे.

एमएमआरसीएलची पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पर्जन्य जलवाहिन्या स्वच्छ करणे, त्यातील गाळ काढून टाकणे, तसेच कॅच पिटस बांधणे अशी कामे प्रगतिपथावर आहेत. यासह वाहतुकीत अडथळा येऊ नये, यासाठी दिशादर्शकांची रंगरंगोटी करणे, बॅरिकेड्स स्वच्छ करणे, कामाच्या आजूबाजूचे रस्ते सुस्थितीत ठेवणे ही कामे ३१ मेपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत.